# ePaper शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या पूर्वसंध्येला रायगडवर जल्लोष, ढोल ताशांचा गजर अन् फटाक्यांची आतिषबाजी!



| वर्ष - 6 । अंक - 62 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 6 जून 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews




पालखी मार्गावरील वाहतूक नियोजनासाठी अधिकाऱ्यांनी आवश्यक उपाय करावेत, सर्वांनी मिळून प्रशासनाला सहकार्य करावे. आळंदीला वाहनतळासाठी जागा संपादन करावे , त्यासाठी सहकार्य करण्यात येईल. सोपानदेव पालखी मार्गावरील रस्त्यातील खड्डे जिल्हा परिषदेने त्वरित बुजवावे. पालखी मार्गावरील शासकीय जागेची सुविधेच्यादृष्टेने माहिती घेऊन अशा जागा पालखी सोहळ्यासाठी कायमस्वरुपी आरक्षित करण्याबाबत प्रस्ताव तयार करावा.

**अजितदादा पवार**, उपमुख्यमंत्री

"हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंनी सांगितलं होतं, शरद पवारांना लाथ मारा, ते बेशुद्ध पडतील, नंतर त्यांना कांद्याचा वास द्या, म्हणजे शुद्धीवर आल्यावर ते कांद्याला भाव देतील. आज मुख्यमंत्रिपदावर असलेले उद्धव ठाकरे बाळासाहेबांच्या आदेशाचं पालन करणार का?",नातवाला लॉन्च करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीदिनी शरद पवार यांनी चौंडीत येऊन राजकारण केलं. राजकारणासाठी प्रेरणास्थळाचा वापर कसा काय करता.

**-गोपीचंद पडळकर**, भाजप नेते



## शॉर्ट न्यूज »

### रोहित पवार मंत्री कधी होणार ? शरद पवार यांनीच दिले उत्तर!

**। पुणे ।** राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार मंत्री कधी होणार, असा प्रश्न पुण्यात एका कार्यक्रमात पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना विचारण्यात आला. त्यावर मला आमदाराचा नामदार व्हायला पाच वर्षे लागली, असे उत्तर पवार यांनी दिले. त्यामुळे आमदार होऊन अडीच वर्षे झालेल्या रोहित पवार यांना मंत्री होण्यासाठी आणखी किमान अडीच वर्षे थांबावे लागेल, अशी चर्चा या कार्यक्रमानंतर सुरू झाली. रोहित पवार यांच्या मंत्रीपदाच्या प्रश्नावर थेट उत्तर न देता पवार म्हणाले, " मी १९६७ साली आमदार झालो. नामदार होण्यासाठी त्यानंतर मला पाच वर्षे वाट पाहावी लागली."

## भाजप नेत्यांची तासभर खलबत, भाजपसाठी एक-एक मत महत्वाचे

# आमदार लक्ष्मण जगताप यांना राज्यसभेच्या मतदानाला आणायचे कसे?

## धनंजय महाडिक यांना निवडूण आणण्यासाठी भाजपची रणनिती तयार

**। पिंपरी । । महाईन्यूज ।**

भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांना राज्यसभेसाठी मतदानाला विधानभवनात आणायचे कसे यावर भाजपचे महाराष्ट्राचे निवडणूक प्रभारी आणि केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव आणि भाजपच्या सर्व जेष्ठ नेत्यांमध्ये सुमारे तासभर खलबत झाली. अशातच राज्याचे विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांना कोरोनाची लागण झाल्याने प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, आशिष शेलार आणि गिरीश महाजन यांच्या खांद्यावर सर्व जबाबदारी आली आहे. फडणवीस यापुढील बैठकांना व्हिडिओ कॉल किंवा फोनवरुन संपर्कात राहणार आहेत. आमदार जगताप यांना काही दिवसांपासून गंभीर आजाराने ग्रासले आहे. २ दिवसांपूर्वीच तब्बल ५० दिवसांच्या उपचारानंतर त्यांना पुण्याच्या ज्युपिटर हॉस्पिटलमधून डिस्चार्ज देण्यात आला आहे. यापूर्वी ते अमेरिकेतही उपचार घेऊन आले होते. त्यानंतरही त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना १२ एप्रिल रोजी ज्यूपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथे त्यांना व्हेंटीलेटर देखील लावण्यात आला होता. अमेरिकेहून मागविलेल्या सुमारे एक



### भाजप नेत्यांमध्ये खलबत

➡ महाडिक यांना निवडूण आणण्यासाठी भाजपने रणनिती तयार केली असून त्यानुसार अपक्ष आमदार आणि महाविकास आघाडीसह असलेल्या छोट्या पक्षांच्या आमदारांशी संपर्क करण्यास सुरुवात केली आहे. धनंजय महाडिक यांनी बहुजन विकास आघाडीचे प्रमुख आणि आमदार हितेंद्र ठाकूर यांची भेट घेतली. त्यामुळेच भाजपसाठी एक-एक मत महत्वाचे असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळेच आमदार जगताप यांना मतदानासाठी आणायचे कसे यावर आज भाजप नेत्यांमध्ये खलबत झाली.

लाख रुपयाच्या इंजेक्शनमुळे त्यांच्या प्रकृती कमालीची सुधारणा झाली आहे. भाजपने केंद्रीय मंत्री पियुष गोयल, माजी कृषी मंत्री अनिल बोंडे आणि कोल्हापुरचे माजी खासदार धनंजय महाडिक यांना राज्यसभेच्या रिंगणात उतरवले आहे. विधानसभेतील संख्याबळानुसार पियुष गोयल आणि अनिल बोंडे यांच्या रुपाने भाजपच्या 2 जागा आरामात निवडून येणार आहेत. मात्र धनंजय महाडिक यांच्यारुपाने भाजपने तिसरा आणि अतिरिक्त उमेदवार दिला आहे.

# पिंपरी-चिंचवड प्रभाग रचनेबाबत राज्यपालांकडे तक्रार!

## भाजपाचे विलास मडिगेरी म्हणतात : प्रभाग रचनेत राजकीय हस्तक्षेप झाला

**। पिंपरी -चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी - चिंचवड महापालिका प्रशासनाने आगामी सार्वत्रिक निवडणूक 2022 साठीची केलेली प्रभागरचना नियमबाह्य आणि चुकीच्या पद्धतीने केली आहे. प्रभागरचना करताना त्यामध्ये राजकीय हस्तक्षेप झाला. राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन करता प्रभाग तयार करण्यात आल्याची तक्रार राज्याचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे भाजपचे स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विलास मडिगेरी यांनी केली आहे. तसेच ही संपूर्ण प्रभागरचना रद्द करण्याची मागणी त्यांच्याकडे केली.

महानगरपालिकेच्या प्रभागरचनेला स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विलास मडिगेरी यांनी उच्च न्यायालयात याचिकाही दाखल करत आव्हान दिले आहे. या याचिकेमुळे महानगरपालिकेच्या अडचणीत वाढ झाली असून येत्या



8 जून रोजी महानगरपालिकेला उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करावे लागणार आहे. न्यायालयीन लढाईबरोबरच विलास मडिगेरी यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेऊन पत्राद्वारे त्यांच्याकडे तक्रार केली आहे.

### प्रभागरचना बनविताना गोपनियतेचा भंग

➡ मडिगेरी यांनी राज्यपाल यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, प्रारुप प्रभागरचना प्रसिद्ध होण्याच्या 3 महिन्यापूर्वी 25 नोव्हेंबर 2021 रोजी अस्तित्वातील प्रभाग क्रमांक 8 चे तीन भागात चुकीच्या पद्धतीने मोडतोड होणार अशी लेखी तक्रार अपणाकडे व राज्य निवडणूक आयोगाकडे केली होती. तरीही त्याची दखल न घेता त्या प्रमाणे प्रारुप प्रभागरचना जाहीर झाली. राज्य निवडणूक आयोगाने कळविल्याप्रमाणे हरकत नोंदवून व सुनावणीत बाजू मांडल्यानंतर ठोस बदल झाला नाही. जैसे थे परिस्थिती आहे. नियमबाह्य पद्धतीने या प्रभागाची रचना मोड तोड करून करण्यात आली. प्रभागरचना बनविताना गोपनियतेचा भंग व राजकीय हस्तक्षेप झाला, असे माझे मत आहे.

## शॉर्ट न्यूज »

### वेळ आली तर घरी बसू पण इतर पक्षात जाणार नाही- तानाजी सावंत



पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

माजी मंत्री आमदार तानाजी सावंत शिवसेना सोडून भाजपमध्ये प्रवेश करु शकतात. असं राजकीय वर्तुळात नेहमीच बोललं जात आहे. मात्र, स्वत: सावंत यांनीच या साऱ्या चर्चेचं खंडण करीत आपण शिवसेना सोडून इतर कोणत्याही पक्षात जाणार नसल्याचं जाहीर केलं आहे.वेळ आली तर घरी बसू पण कोणत्याही पक्षात जाणार नाही, असे आमदार सावंत यांनी ठामपणे सांगितले आहे. वेळ आली तर मी घरी बसेन पण दुसऱ्या कुठल्याही पक्षाचा झेंडा हातात घेणार नाही, असे सावंत यांनी उस्मानाबादमध्ये शिवसंपर्क अभियानात बोलताना सांगितले. महाविकास आघाडी (MAHAVIKAS AGHADI) सरकारमध्ये मंत्रिपदापासून डावलल्यानंतर तानाजी सावंत शिवसेनेपासून काहीसे दुरावल्याचे दिसत आहे. युती सरकारच्या काळात मंत्रीपद सांभाळल्यानंतर आता सक्रिय नसल्यामुळे, त्याचबरोबर जिल्ह्यातील स्थानिक नेत्यांशी अधून-मधून खटके उडत असल्याने आमदार सावंत शिवसेना सोडणार अशी चर्चा नेहमी सुरू असते. या साऱ्या चर्चांना आमदार सावंत यांनी पूर्णविराम दिला आहे.

या संदर्भात बोलताना आमदार सावंत म्हणाले, " शिवसेना सोडून मी इतर कोणत्याही पक्षात जाणार नाही. वेळ आली तर घरी बसेन पण अन्य कुठल्या पक्षाचा झेंडा हाती घेणार नाही. शिवसेना माझ्या घरात, माझ्या मनात आहे. धाराशिव जिल्ह्यावर शिवसेनेचा भगवा फडकविणार हे वचन देतो." पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उस्मानाबाद जिल्ह्यातील शिवसैनिक आणि तरुणांची बैठक बोलवावी. बाळासाहेबांच्या शिवसैनिकांना मान मिळायला हवा, अशी अपेक्षा सावंत यांनी व्यक्त केली.

---

### पाच वर्षांपूर्वी जिल्हा परिषदेला भाजपचा उमेदवार निवडून आला होता

# खेडमध्ये भाजपला खिंडार; मोहितेंच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

## भाजपला अधिक परिश्रम घ्यावे लागणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील भारतीय जनता पक्षाच्या (BJP) कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (NCP) प्रवेश केला. या कार्यकर्त्यांचे आमदार दिलीप मोहिते (Dilip mohite) यांच्यासह पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. हा भाजपसाठी धक्का मानला जात असून पाच वर्षांपूर्वी याच भागातून जिल्हा परिषदेला भाजपचा उमेदवार निवडून आला होता. आता झेडपी निवडणुकीच्या तोंडावर कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने भाजपला अधिक परिश्रम घ्यावे लागणार आहेत.



खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील आंभू, आंबोली आणि आखतूली गावच्या भाजपच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याने पश्चिम पट्ट्यात भाजपाला खिंडार पडण्यास सुरुवात झाली आहे. भाजपचे वाशेरे गणाचे अध्यक्ष सुनील लोहोट, आभूचे माजी सरपंच विठ्ठल राजगुरव, उपसरपंच शिवाजी राजगुरव, बाबूराव राजगुरव, दत्तात्रय तुपे, दतू लोहोट, विलास राजगुरव, बाळू राजगुरव, रोहन शिंदे आदी कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीचे घड्याळ हाती बांधले.

जिल्हा दूध संघ, जिल्हा बँक ,तालुका बाजार समिती,आणि तालुक्यातील बहूसंख्य सहकारी सोसायट्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने मुसंडी मारून सत्ता काबीज केली आहे. पाच वर्षांपूर्वी याच पश्चिम भागातून भाजपचे अतुल देशमुख जिल्हा परिषदेवर निवडून गेले होते. याचगटातील भाजपच्या कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश झाल्याने भाजपला मोठा धक्का बसला असल्याची जोरदार चर्चा आहे.

जिल्हा दूध संघाचे संचालक अरुण चांभारे व माजी सभापती सुरेश शिंदे यांनी सांगितले की, खेडचा पश्चिम पट्टा भाजपचा झाला असल्याची स्वप्न गेली चार पाच वर्षांपासून काहींना पडत होती. मात्र, पश्चिम पट्टा हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असून या भागातील जनता राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठीमागे आजदेखील उभी आहे. आगामी निवडणुकीतही हा भाग राष्ट्रवादीचा व आमदार मोहितेंचा कट्टर समर्थक असल्याचे दाखवून देतील यात शंका नाही.

**यांची होती उपस्थिती...**

▶▶ या पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमास आमदार दिलीप मोहिते, सुरेखा मोहिते, जिल्हा दूध संघाचे संचालक अरुण चांभारे, मंगल चांभारे, माजी सभापती सुरेश शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष कैलास सांडभोर,राष्ट्रवादी पश्चिम विभागाध्यक्ष नामदेव गोपाळे, किरण वाळुंज, आंभूचे सरपंच विनोद लोहोट, माजी सरपंच भागुजी राजगुरव, किसन मराठे, पाटीलबुवा काळोखे, संतोष लोथे, माऊली कांबळे, दत्ता काळोखे, माउली लोथे, माउली तुपे, चिंधू तुपे यांच्यासह अनेक पश्चिम भागातील असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# धायरीतील मल्हार गड खंडोबा मंदिर परिसरात वृक्षारोपण

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एनपीसी संस्था, संस्कृती फाउंडेशन व सिंहगड ट्रेकर्सचा उपक्रम

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून एनपीसी संस्था, संस्कृती फाउंडेशन व सिंहगड ट्रेकर्स परिवार यांच्या वतीने धायरी येथील मल्हार गड खंडोबा मंदिर आणि नारायणराव सणस विद्यालय येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी आठ ते दहा फूट उंचीचे वड, पिंपळ, कादंबा, कांचन, सोनचाफा, कारंज, सप्तपर्णी आदी देशी वृक्षांची लागवड केली.

यावेळी एनपीसी संस्थेचे अमित शहा, संजय मंडोत, करण उथरा, यासीन देसाई, सिंहगड ट्रेकर्सचे चंद्रशेखर पोकळे पाटील, स्वप्निल लहानमगे, जर्नादन भुमकर, महेश भिसे, संतोष लक्ष्मण पोकळे (माजी पंचायत समिती सदस्य), अतुल काकडे, अर्जुन पवार, भारत खाटपे, नारायणराव सणस विद्यालयचे अशोक कापरे, संस्कृती फाउंडेशनचे शरणू जवळगी, स्नेह वसंत फाऊंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

वृक्षारोपणाच्या पहिल्या टप्प्यात धायरी येथील मल्हार गड खंडोबा मंदिर आणि नारायणराव सणस विद्यालय वृक्षारोपणासाठी ही ठिकाणे निवडण्यात आली होती. वृक्षारोपणात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी पुढील टप्प्यात पुणे महानगरालिकेच्या शाळेत वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याचे सिंहगड ट्रेकर्सचे चंद्रशेखर पोकळे पाटील यांनी सांगितले.



अमित शहा म्हणाले, आपण विविध व्यवसाय करत असताना कोणत्या ना कोणत्या प्रकारे निसर्गाला हानी पोहचवत असतो. परंतु ती हानी कमी करून आपण पर्यावरण सुदृढ करण्यावर भर दिला पाहिजे. या उपक्रमासाठी मल्हार गड खंडोबा मंदिर, नारायणराव सणस विद्यालय आणि स्नेह वसंत फाऊंडेशनने विशेष सहकार्य केले.

## पिंपरी-चिंचवडमध्ये पर्यावरण दिनी सायकल रॅली

# पर्यावरण संवर्धनासाठी कृतिशील आचरण हवे !

### महापालिका आयुक्त राजेश पाटील यांची भूमिका

। पिंपरी । महाईन्यूज ।

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी व्यक्तीगत जीवनात पर्यावरणपूरक कृतिशील आचरण आवश्यक आहे. त्यादृष्टीने दैनंदिन जीवनात सायकलचा अधिक प्रमाणात वापर करावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांनी केले. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने रविवारी (दि. 5) जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भक्तीशक्ती चौक निगडी ते दापोडी तसेच दापोडी ते भक्तीशक्ती चौक निगडी दरम्यान सायकल फेरीचे आयोजन करण्यात आले होते. आयुक्त राजेश पाटील यांच्या हस्ते सायकल फेरीचे झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली. त्यावेळी शहरवासीयांना संबोधित करताना ते बोलत होते. तसेच, पर्यावरण दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. भक्तीशक्ती चौक निगडी येथे झालेल्या या कार्यक्रमामध्ये अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, उपायुक्त रविकिरण घोडके, कार्यकारी अभियंता प्रमोद ओंभासे, बापुसाहेब गायकवाड, प्रेरणा सिनकर, स्मार्ट सिटीच्या सचिव चित्रा पंवार, उपअभियंता सुनील पवार, अनिल सुर्यवंशी, संजय साळी, इकोपेडलर संस्था, अविरत श्रमदान संस्था आदींसह सायकल प्रेमी व पर्यावरण प्रेमी मोठ्या संख्येने सायकल फेरीमध्ये सहभागी झाले होते. सायकल फेरीमध्ये सहभागी झालेल्यांना पदके देऊन सन्मानित करण्यात आले.



### काय म्हणाले आयुक्त पाटील...

यावेळी बोलताना आयुक्त राजेश पाटील म्हणाले, महापालिकेच्या वतीने शहरात स्वच्छाग्रह उपक्रमांतर्गत विविध अभियान आणि मोहिम राबविल्या जात आहेत. नागरी सहभाग वाढावा तसेच स्वच्छतेची चळवळ अधिक व्यापक व्हावी, याकरीता विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. या अनुषंगाने पर्यावरण दिन आणि सायकल दिनाचे औचित्य साधून सायकल फेरीद्वारे नागरिकांना स्वच्छतेविषयी तसेच पर्यावरणाविषयी प्रबोधन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. शहरात निरंतर प्लॉगेथॉन मोहिम राबवून कचरा संकलन केला जात आहे. तसेच प्लास्टीक मुक्त शहर करण्यासाठी नागरिकांना आवाहन देखील करण्यात येत आहे. पर्यावरणाचा आपल्या जीवनमानावर परिणाम होत असतो, असेही आयुक्त राजेश पाटील यावेळी म्हणाले.

# पर्यावरण विरोधी भूमिकेविरोधात सांकेतिक उपोषण

### सामाजिक कार्यकर्ते प्रशांत राऊळ यांची प्रशासनावर नाराजी



। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिका पर्यावरण संवर्धनाच्या जबाबदारीपासून दूर जात आहे. प्रशासनाला त्यांची जबाबदारी पार पडण्यास भाग पडू असा विश्वास घेऊन सामाजिक कार्यकर्ते प्रशांत राऊळ यांनी जागतिक पर्यावरण दिनादिवशी रविवारी (दि. 5 जून) एक दिवसीय सांकेतिक उपोषण केले. पालिकेकडे वारंवार पर्यावरण रक्षणाच्या विविध मुद्द्यांवर चर्चा, पाठपुरावा केला असता पालिका कुठलाही प्रतिसाद देत नसल्याने हे सांकेतिक उपोषण असल्याचे प्रशांत राऊळ यांनी सांगितले.

प्रशांत राऊळ म्हणाले, "पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन पर्यावरणाच्या सर्व पातळ्यांवर फेल झाले आहे.

जलप्रदूषण, वायुप्रदूषण, कचरा प्रश्न, पाणी लिकेज, ड्रेनेज, अवैध वृक्षतोड, प्लास्टिक, कचराडेपो, रस्त्याच्या बाजूला फेकला जाणारा कचरा, औद्योगिक वसाहतीत जाळला जाणारा घातक कचरा या सर्व बाबतीत पालिका अपयशी होत आहे. शहराचे अतोनात नुकसान होत आहे. याबाबत पालिकेला ईमेल्स, वैयक्तिक भेट, जनसंवाद, माहिती अधिकार या सर्व माध्यमातून संपर्क केला आहे. मात्र पालिकेकडून कोणताही प्रतिसाद देण्यात आला नाही.

### काय म्हणाले आयुक्त पाटील...

पालिका प्रशासनाला याबाबतीत केवळ प्रश्न उपस्थित न करता त्यावरील उत्तरासह पाठपुरावा केला असता त्यावर समाधानकारक उत्तर अद्याप मिळाले नाही. याबाबत पालिका प्रयत्न करतानाही दिसत नाही. पालिकेच्या पर्यावरण विरोधी कृतींचा आणि असंवेदनशीलतेचा निषेध करण्यासाठी सांकेतिक उपोषण केले. यानंतर न्यायालयीन लढाई लढणार आणि पालिकेला पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी पार पाडण्यास भाग पाडू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# 'सरसेनापती हंबीरराव' हा मराठ्यांचा इतिहास कुटुंबासह अनुभवावा !

### प्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेता प्रवीण तरडे यांचे आवाहन

पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी

हिंदवी स्वराज्याचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या जीवनपटावर आधारीत 'सरसेनापती हंबीरराव' हा चित्रपट मराठ्यांचा इतिहास आहे. बारा बलुतेदार, सर्व जाती-धर्माच्या लोकांना एकत्र करुन छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची स्थापना केली. मराठ्यांना 'मरहट्टे' म्हणून ओळखले जाते. या चित्रपटासाठी आम्ही प्रामाणिक मेहनत घेतली आहे. हा आपला इतिहास कुटुंबासह अनुभवावा, असे आवाहन प्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेता प्रवीण तरडे यांनी केले.



भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी चिंचवड येथील 'कार्निवल' चित्रपटगृहात 'सरसेनापती हंबीरराव' चित्रपटाच्या एका संपूर्ण शोचे बूकिंग केले होते. यावेळी चित्रपटाच्या टीमसोबत तरडे यांनी याठिकाणी भेट दिली.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, आपण हिंदी-इंग्रजीमधील अनेक सिनेमे आपण डोक्यावर घेतो. मात्र, आपल्या महाराष्ट्राशी संबंधित आपल्या गौरवशाली हिंदवी स्वराज्याशी संबंधित सिनेमांना आपण पहिली पसंती दिली पाहिजे. मराठ्यांच्या लढाया आणि रोमहर्षक जीवन अनुभवयल्यावर आपल्याला आभासी 'ॲक्शन फिल्म'ची आवश्यकता वाटणार नाही. महाराष्ट्रातील प्रत्येक कुटुंबाने हा चित्रपट पहावा, आपल्या नात्यातील आणि मित्र परिवारातील सर्वांना हा चित्रपट आवर्जुन बघण्यास सांगावा, कारण आपला इतिहास आपल्याला समजला पाहिजे.

अभिनेता प्रवीण तरडे म्हणाले की, मराठीतील आतापर्यंतचा हा सर्वात बिग बजेट चित्रपट आहे. चित्रपटातील सरसेनापती हंबीरराव मोहीते यांची मुख्य भूमिका मी साकारली आहे. त्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून आम्ही मेहनत घेत आहोत. चित्रपट रोमांचकारी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. चित्रपटाला महाराष्ट्रभर चांगला प्रतिसाद मिळत असून, तीन दिवसांत सुमारे ९ कोटी रुपयांचा व्यावसायक ला आहे. सर्वांनी हा चित्रपट चित्रपटगृहात येवूनच पहावा कारण त्याची भव्यता कोणत्या ॲपवर बघून कळणार नाही.

### महेश लांडगेंनी दिलेला शब्द खरा केला...

चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहामध्ये दिग्दर्शक व अभिनेता प्रवीण तरडे यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम काही दिवसांपूर्वी झाला होता. दिशा सोशल फाउंडेशनच्या पुढाकाराने झालेल्या या कार्यक्रमाला आमदार महेश लांडगे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. 'सरसेनापती हंबीरराव' चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी झालेल्या या कार्यक्रमात आमदार लांडगे यांनी तरडेंना शब्द दिला होता. "मराठ्यांचा गौरवशाली इतिहास आणि 'चांगला मामा कसा असावा?' हे सर्वांना कळले पाहिजे. यासाठी मी चित्रपट प्रदर्शित झाल्यांनंतर एक शो बूक करुन लोकांना मोफत दाखवीन." असे लांडगे यांनी जाहीरपणे सांगितले. तो शब्द करा करीत लांडगे यांनी शो- बूक करुन नातेवाईक व मित्र परिवारासोबत प्रवीण तरडे यांच्या उपस्थितीत चित्रपट पाहिला. याद्वारे आमदार लांडगे यांनी इतिहासाभिमान आणि मित्रप्रेमही जपले.

## संपादकीय »

### अर्थव्यवस्था अजूनही दोलायमानच!

***राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने ३१ मे २०२२ रोजी सकल राष्ट्रीय उत्पादनाचे त्रमासिक अंदाज तसेच राष्ट्रीय उत्पन्नाचा तात्पुरता अंदाज जाहीर केला. त्यासंदर्भात माध्यमांशी बोलताना मुख्य आर्थिक सल्लागार काहीसे दबल्यासारखे वाटत होते. आपला आशावाददेखील ते अतिशय सावधपणे व्यक्त करत आहेत हे जाणवत होते. इतर बहुतेक अर्थतज्ज्ञांप्रमाणेच त्यांनाही माहीत आहे की, भारतीय अर्थव्यवस्था अजूनही दोलायमान परिस्थितीतच आहे.***

३१ मार्च २००० रोजी स्थिर किमतींवर अर्थव्यवस्थेचा आकार (१४५.१६ लाख कोटी रुपये) इतका होता. सगळ्यात वाईट बाब म्हणजे ३१ मार्च २०२२ रोजीदेखील तो (१४७.३६ लाख कोटी रुपये) जवळजवळ तितकाच होता. म्हणजे आपली सगळी धडपड, धावपळ सुरू आहे ती एकाच जागी उभे राहण्यासाठी. म्हणजे आपण चालत आहोत, पण पुढे जात नाही, तर एकाच जागी उभे आहोत. त्याचबरोबर दोन वर्षांत दरडोई उत्पन्न १,०८,२४७ रुपयांवरून १,०७,७६० रुपयांवर आल्यामुळे वैयक्तिक पातळीवर भारतीय नागरिक अधिकच गरीब झाले आहेत. पुढची वाईट बातमी म्हणजे २०२१-२२ मधील सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या वाढीचा तिमाही आलेख हा वाढीचा नाही तर उताराचा आहे. या काळातील चार तिमाहींमध्ये राष्ट्रीय उत्पादनाच्या वाढीचा दर प्रत्येकी २०.१, ८.४, ५.४ आणि ४.१ टक्के असा आहे. उत्पादनाच्या (मूल्यवर्धन) बाबतीत कोणतीही भरपूर आणि जास्तीची वाढ झालेली दिसलेली नाही. करोनाच्या महासाथीच्या आधीच्या वर्षात म्हणजे २०१९-२० च्या चौथ्या तिमाहीत, सकल राष्ट्रीय उत्पादन ३८,२१,०८१ कोटी रुपये होते. आपण २०२१-२२ या वर्षाच्या चौथ्या तिमाहीत हा आकडा ओलांडला. या कालावधीत सकल राष्ट्रीय उत्पादन ४०,७८,०२५ कोटी रुपये नोंदवले गेले. भारत ही ८.७ टक्क्यांसह सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था आहे, अशा बढाया मारण्यात काहीही अर्थ नाही. महागाई, बेरोजगारी, दारिद्र्यरेषेखालील लोकांची वाढती संख्या, उपासमारीचे वाढते प्रमाण, घसरत चाललेले आरोग्य आणि शिक्षणाचे परिमाण यांचा अभिमान कसा बाळगता येईल? आपला विकासदर ८.७ टक्के आहे, हे ऐकायला अत्यंत आकर्षक वाटत असले तरी त्याच्याकडे अभ्यासपूर्ण दृष्टिकोनातून बघितले पाहिजे. सगळ्यात पहिली गोष्ट म्हणजे विकासदराची ही आकडेवारी दिसते आहे ती, मागील वर्षीच्या उणे ६.६ टक्के या नकारात्मक वाढीमुळे. दुसरे म्हणजे, २०२१ मध्ये चीनचा विकासदर वाढून ८.१ टक्के झाला. तेव्हा त्या बारा महिन्यांत त्याच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये २६०० अब्ज अमेरिकी डॉलरची भर पडली.



## आनंदी सकाळ

### भगवंताचे सतत अनुसंधान हाच स्थिर होण्याचा एकमेव उपाय

राम कर्ता' म्हटल्याशिवाय, म्हणजेच अभिमान सोडल्याशिवाय, परमार्थ नाही साधणार. 'मी देही' म्हणू लागलो यात अभिमान आला. देहबुद्धीला कारण म्हणजे वासना. वासना हे सर्वांचे मूळ आहे. 'माझा जन्मच जर वासनेत आहे तर ती बाजूला काढल्यावर आम्ही जिवंत कसे राहू?' असे वाटते. जो या वासनेचा खून करतो, तोच परमार्थाला लायक होतो. अंती जी मती, ती जन्माला कारण होते. हे सगळे ज्ञानाचे बोलणे झाले, पण प्रचितीने हे सर्व जाणावे. बायकापोरांचा त्रास होतो, मन एकाग्र होत नाही, म्हणून बुवा झाला; मठ केला. लोक येऊ लागले, त्यांना जेवायला घालण्याकरिता भिक्षा आणू लागला, पण भगवंत सर्वांना खायला घालतो हे विसरला! छप्पर गळू लागले ते नीट करण्याची काळजी करू लागला. मग घरादारांनी काय केले? असा बुवा होण्यापेक्षा प्रपंचात राहिलेले काय वाईट ! थोडक्यात म्हणजे, परमार्थ समजून जो त्याचे आचरण करील, त्याला तो लवकर साधेल. त्या माणसाला प्रपंच सोडून जायचे कारणच उरणार नाही. जगातले आपले समाधान अगर असमाधान, ज्या वृत्तीने आपण जगाकडे पाहतो त्यावर अवलंबून आहे.

## नको अशांतीचे बिंग : 'न्यायालयांचा निकाल साऱ्यांनी मान्य करावा !






पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मतदारसंघ असलेल्या वाराणसीतली ज्ञानवापी मशीद हे मुळातले मंदिर होते का, यासंबंधीचा दावा न्यायालयात असताना आणि त्यानंतर इतरही अनेक ठिकाणचे असे विवाद उफाळून येत असताना, सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी काही महत्त्वपूर्ण विधाने केली आहेत. नागपुरात दर वर्षी संघाच्या स्वयंसेवकांच्या औपचारिक प्रशिक्षणाचा अंतिम टप्पा मानला जाणारा तृतीय वर्षाचा वर्ग चालतो. करोनाकाळात असे दोन वर्ग होऊ न शकल्याने, यंदाच्या वर्गाला आणि त्याच्या समारोपालाही वेगळे महत्त्व होते. यावेळच्या भाषणात भागवत यांनी देशकालस्थितीचा सविस्तर आढावा घेतला असला, तरी धर्मस्थळांचे विवाद एका मर्यादेपलीकडे वाढवता कामा नयेत, हा स्पष्ट संदेश त्यांनी दिला आहे. 'अयोध्या हा अपवाद होता' असे सांगून त्यांनी सध्याच्या अशा साऱ्या आंदोलने आणि कज्जेदलालीपासून संघाला अलिप्त केले आहे. असे करताना, 'प्रत्येक मशिदीच्या खाली शिवलिंग शोधायचे का?' या त्यांच्या प्रश्नाला स्वाभाविकच मोठी प्रसिद्धी मिळाली आहे. देवबंद या देशातील सर्वात प्रभावी इस्लामी केंद्राचे उलेमा मुफ्ती असद कासमी यांनी भागवत यांचे हे प्रतिपादन उचलून धरताना, 'देशात शांतता, बंधुभाव राहावा आणि देशाने प्रगती करावी,' असे म्हटले आहे. देशातील प्रत्येक 'सेक्युलर' व्यक्तीची हीच इच्छा आहे, अशी पुस्तीही भागवत यांचे समर्थन करताना जोडली आहे. याच वेळी, वाराणसीचा विवाद न्यायालयात लढणारे वकील हरिशंकर जैन यांनी मात्र, 'आपला न्यायालयीन लढा चालू राहील,' असे म्हटले आहे. अर्थात, भागवतांनीही 'न्यायालयांचा निकाल साऱ्यांनी मान्य करावा,' असे म्हटलेच आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर वाराणसी आणि मथुरा यांच्या पाठोपाठ देशभरातल्या ठिकठिकाणच्या धर्मस्थळांबाबत दावे-प्रतिदावे करीत सरसावलेली मंडळी चार पावले मागे जातात का, हे पाहावे लागेल.

भागवतांनी युक्रेन आणि रशिया यांच्या संघर्षाचा उल्लेख करून, भारत पुरेसा शक्तिमान असता, तर त्याने हा संघर्ष रोखला असता, असे म्हटले आहे. जगात कुठेही हिंसाचार भडकू नये आणि रक्तपात होऊ नये, अशी भूमिका घेत असताना, देशांतर्गत विवादांबाबतही सामंजस्याची व भातृभावाची भूमिका घेणे तर्कसुसंगत होते. आजच्या स्थितीत ते आवश्यकही आहे. आता प्रश्न असा, की वाराणसी आणि मथुरा येथील धर्मस्थळांचा विवाद हाती घेतलेले लोक हा विषय कटाक्षाने न्यायालयीन चौकटीतच ठेवण्यास बांधील राहतात की नाही, हा आहे. याबाबत, अयोध्या आंदोलनाचे नेतृत्व केलेली संघटना म्हणून रा. स्व. संघ आणि विश्व हिंदू परिषद यांची विशेष जबाबदारी आहे. ते आंदोलन कसे हिंसक बनले आणि अनेकदा नेत्यांच्या हाताबाहेर गेले.

## जातीनिहाय जनगणनेत प्रादेशिक पक्षांना लाभ

**हिंदुंनी जाती आणि पोटजातींच्या खोलात न जाता हिंदू म्हणून एक व्हावे. याचा फायदा समाजात एकोपा टिकवण्यासाठी होईलच, पण त्यापेक्षा कांकणभर जास्तच फायदा भाजपला होईल, हे वास्तव आहे. जातीनिहाय जनगणना झाल्यास प्रादेशिक पक्षांना त्याचा अधिक फायदा होईल, हे न कळण्याएवढे शरद पवार वा नितीशकुमार राजकारणात नवखे नाहीत.**

'मंडलोत्तर मोजणीचे महत्त्व' हा अग्रलेख (३ जून) वाचला. गेल्या काही वर्षांपासून सर्वांचे लक्ष आपल्या देशातील एका महत्त्वाच्या विषयावर केंद्रित झाले आहे आणि तो विषय म्हणजे 'आम्ही किती?' प्रत्येक जातीला आपली नेमकी संख्या किती, हा प्रश्न पडला आहे. लोकशाही प्रणालीत गुणांपेक्षा संख्या महत्त्वाची आहे. संख्या म्हणजे बहुमत आणि बहुमताने घेतलेला निर्णय योग्यच अशी धारणा असते.

प्रत्येक समाजाचे आणि जातीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राजकीय नेत्यांच्या मनात काय शिजत असते, हे कुणी वेगळे सांगायला नको. मी ज्या जातीचे नेतृत्व करते/ करतो, त्या जातीच्या व्यक्तींची नेमकी संख्या किती आहे, मला या संख्येचा राजकीय फायदा कसा घेता येईल, याचाच विचार नेत्यांच्या मनात असतो. पूर्वी धार्मिक असलेले नेते आता जातीय होत चालले आहेत. कारण राजकारण आता खोलवर



झिरपत चालले आहे. मंत्रिमंडळात एखाद्या नेत्याला संधी दिली जाते तेव्हा अमुक समाजाला किंवा जातीला प्रतिनिधित्व दिल्याचा दावा केला जातो. अर्थ स्पष्ट आहे की, ज्या जातीची लोकसंख्या जास्त त्यांचा दबदबा जास्त. सरकारला नेमके हेच नको आहे. ही संख्या जेव्हा समजेल तेव्हा, अमुक एका समाजाला मिळणाऱ्या सुविधा किती तुटपुंज्या आहेत, हे सांगण्यासाठी ज्योतिषाची गरज भासणार नाही. संघ प्रचारक भाषणात नेहमी सांगतात- हिंदुंनी जाती आणि पोटजातींच्या खोलात न जाता हिंदू म्हणून एक व्हावे. याचा फायदा समाजात एकोपा टिकवण्यासाठी होईलच, पण त्यापेक्षा कांकणभर जास्तच फायदा भाजपला होईल, हे वास्तव आहे. जातीनिहाय जनगणना झाल्यास प्रादेशिक पक्षांना त्याचा अधिक फायदा होईल, हे न कळण्याएवढे शरद पवार वा नितीशकुमार राजकारणात नवखे नाहीत. पण त्यामुळे आपल्यासारख्या राष्ट्रीय पक्षांची कोंडी होणार, हे भाजप जाणून आहे. म्हणूनच जातीनिहाय जनगणनेबाबत चर्चेचे गुऱ्हाळच सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्वातंत्र्यापासून लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षित जागा या सूत्रात अडकलेल्या इतर मागासवर्गीयांना आरक्षणाचा थोडाफार लाभ मिळाला, तोच 'मंडल कमंडल'च्या राजकारणामुळे. पण राज्याराज्यांत आरक्षणाचे प्रमाण बदलले गेले, त्याच्या अंमलबजावणीत सुसूत्रता राहिली नाही.

## ।। अभंगवाणी ।।



मजसवें आतां येऊं नका कोणी । सासुरवासिनी बाइयानो ॥१॥
न साहवे तुम्हां या जनाची कूट । बोलती वाईट ओखटें तें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज »

### सोमय्यांकडून ठाकरेंच्या आणखी एका कंपनीचा गौप्यस्फोट



। नाशिक । महाईन्यूज ।

भाजप नेते किरीट सोमय्या यांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. दादर येथील श्रीजी होम्सवरून मुख्यमंत्र्यांना टार्गेट केलं आहे. या कंपनीचा लेखाजोखा मांडत त्यांनी या कंपनीच्या व्यवहाराची चौकशी केली पाहिजे, अशी मागणी केली. नाशिकमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत सोमय्या बोलत होते. शिवाजी पार्क कॅटरिंग कॉलेजजवळ श्रीजी होम्स नावाची इमारत उभी आहे. ही इमारत अद्यापही रिकामी असून उद्धव ठाकरे आणि त्यांच्या निकटवर्तीयांची ही इमारत असल्याचा दावा किरीट सोमय्या यांनी केला आहे. ते म्हणाले की, ही इमारत कोणाची? ही कंपनी कोणाची? त्याचे मालक कोण? त्याचे पार्टनर कोण? पैसे कुठून आले? असे प्रश्न उपस्थित करत त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर रोख ठेवला.

### डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार माझे उपचार आणि औषधपाणी सुरू आहे-देवेंद्र फडणवीस

# देवेंद्र फडणवीसांना पुन्हा एकदा कोरोनाची लागण, तात्काळ होम क्वारंटाईन!

### गेल्या काही दिवसांमध्ये माझ्या संपर्कात आलेल्यांनी स्वत:ची कोरोना चाचणी करून घेण्याचे केले आवाहन

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राज्याचे** विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना कोरोनाची लागण झाली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: ट्विट करून ही माहिती दिली. माझी कोरोना टेस्ट पॉझिटिव्हि आली आहे. मी सध्या होम आयसोलेशनमध्ये आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार माझे उपचार आणि औषधपाणी सुरु आहे. गेल्या काही दिवसांमध्ये माझ्या संपर्कात आलेल्यांनी स्वत:ची कोरोना चाचणी करुन घ्यावी, असे फडणवीस यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे. कोरोना झाल्यानंतर साधारण सात दिवस क्वारंटाईन राहावे लागते. त्यामुळे १० जून रोजी होणाऱ्या राज्यसभा निवडणुकीला देवेंद्र फडणवीस कसे उपस्थित राहणार, हे पाहावे लागेल. देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारीच महाविकास आघाडीच्या नेत्यांची भेट घेतली होती. त्यामुळे या नेत्यांचीही कोरोना चाचणी पॉझिटिव्ह येणार का, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या



आहेत.

देवेंद्र फडणीस हे काल लातूर दौऱ्यावर होते. लातूरचा दौरा झाल्यानंतर ते सोलापूरच्या दौऱ्यावर जाणार होते. मात्र, त्यांना ताप आल्यामुळं तो दौरा अर्धवट सोडून ते मुंबईच्या दिशेनं रवाना झाले होते. देवेंद्र फडणवीस यांना यापूर्वीही कोरोनाची लागण झाली होती. त्यावेळी फडणवीस यांनी सरकारी रुग्णालयात उपचार घेतले होते.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात कोरोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. सध्या परिस्थिती चिंताजनक नसली तरी सोशल डिस्टन्सिंग आणि मास्कचा आवर्जून वापर करा, अशा सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिल्या आहेत. मुंबईतील दैनंदिन कोरोना रुग्णांचा आकडाही आता ७०० च्या आसपास जाऊन पोहोचला आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत मुंबईसह राज्यात कोरोनाची लाट येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. देशपातळीवरही कोरोना रुग्णांच्या

### मुलांच्या लसीकरणाबाबत मुंबई महापालिकेने घेतला मोठा निर्णय

मुंबईत करोनाची रुग्णसंख्या हळूहळू वाढत लागली असतानाच मुंबई महापालिकेनेही करोनास वेसण घालण्यासाठी तातडीने उपाय सुरू केले आहेत. वैद्यकीय उपचार, चाचण्यांवर भर दिला जात असतानाच लसीकरणावरही नव्याने भर दिला जात आहे. महापालिकेने १२ ते १४ आणि १५ ते १७ वयोगटातील सर्व मुला-मुलींचे लसीकरण प्राधान्याने होण्याकडे लक्ष दिले आहे. वृद्धाश्रमांतील, तसेच अन्य ६० वर्षे आणि त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना बूस्टर डोस देण्यावरही भर दिला आहे. या मोहिमेत पालिकेच्या आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी जाऊन भेटी देण्यात येत आहेत. त्यातून १२ ते १४ आणि १५ ते १७ वयोगटातील पहिली व दुसरी मात्रा न घेतलेल्या मुलांप्रमाणेच ज्या ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांनी बूस्टर मात्रा घेतली नाही, त्यांची यादी तयार करण्यात आली आहे.

### महाराष्ट्रात ईव्ही पॉलिसी आणली, त्याची जागतिक स्तरावर चर्चा : आदित्य ठाकरे



। मुंबई । । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।


**महाराष्ट्रात** ईव्ही पॉलिसी आणली त्याची जागतिक स्तरावर चर्चा आहे. महाराष्ट्रात ईव्ही पॉलिसी आल्यानंतर दीड लाखांहून ईव्ही गाड्या महाराष्ट्रात आहेत. पुण्याची ईव्ही सेल आहे, मुंबईची ईव्ही सेल आहे, असंही आदित्य ठाकरे म्हणालेत. माझी वसुंधरा पुरस्कार सोहळ्यात पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे बोलत होते.पर्यावरण आणि वातावरण बदल हे काम आता एका खात्यापुरतं राहिलेलं नाही. हे खातं सोडून इतर सर्व खात्यांचं काम वाढत चाललं आहे. ऊर्जा खाते असेल, ग्रामविकास खाते असेल, नगरविकास असेल, उद्योग आहे, ट्रान्सपोर्ट आहे या सगळ्या खात्यांचं काम म्हणजे पर्यावरण आणि वातावरण बदलाचं होत चाललंय. 80 हजार कोटींचे करार महाराष्ट्रासाठी घेऊन आलेलो आहोत. पहिल्यांदाच महाराष्ट्र मोठ्या संख्येनं रिप्रेझेंट झाला, पुढच्या वेळी अजून मोठ्या संख्येनं जाऊ.

# वडूथ ते सातारारोड डांबर कम खडी जादा : वडुथवासियांनी पाडले काम बंद

## अत्यंत निकृष्ट दर्जाचे : फक्त खडी टाकून रस्त्याचे काम उरकणाऱ्या ठेकेदाराचे पितळ उघड

। सातारा । महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी ।

**वडूथ** ते सातारारोड येथील रस्त्याचे कामकाज बांधकाम विभागातर्फे करण्यात येत आहे. मात्र हे कामकाज अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे येथील नागरिकांना दिसून येताच वडूथ येथील नागरिकांनी ते काम बंद पाडले. डांबर न टाकताच फक्त खडी टाकून रस्त्याचे काम उरकणाऱ्या ठेकेदाराचे पितळ उघड पाडले. बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना याबाबत संपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद न देता मोबाईल बंद केले. डांबर कम खडी जादा असे काम अजिबात चालणार नाही, काम करावयाचे असल्यास योग्य दर्जाचे



करावे, अशी मागणी वडूथ-सातारा येथील सामाजिक कार्यकर्ते मदन साबळे यांनी वडूथकरांनी यावेळी केली. याविरोधात प्रसंगी आंदोलन करण्याचा इशारा मदन साबळे, ग्रामपंचायत सदस्य सचिन निकम यांनी दिला.

याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते मदन साबळे, ग्रामपंचायत सदस्य सचिन निकम, विकास साबळे, प्रकाश साबळे आदी उपस्थित होते. खडी टाकण्यापूर्वी रस्त्यावर डांबर न टाकताच केवळ खडीच टाकण्यात आली आहे. अशा प्रकारचे काम येत्या पावसाळ्यात कसे टिकणार. याबाबत बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना कळवले असता उडवाउडवीची उत्तरे दिली. तर अभियंता मुनगट्टीवार यांनी तर लेखी स्वरुपातील अर्ज द्या, असा सल्ला दिला यावर स्थानिकांनी संताप व्यक्त केला. या कामाकडे या विभागाचा एक ही अधिकारी एकवेळ ही फिरकत नाही, असा आक्रोश येथील ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.



### निकृष्ट रस्ता : ठेकेदारावर कायदेशिर कारवाई करणार - मदन साबळे

टक्केवारीसाठी अधिकारी कधीच ठेकेदारला बोलत नाहीत. उलट त्याची वकिली करताना दिसतात. यापुढे रस्त्याचे काम निकृष्ट झाले की अधिकाऱ्याला दोषी ठरवून नोकरी गेली पाहिजे. कामाच्या गुणवत्ता, दर्जा राखण्याची जबाबदारी असतानाही अधिकारी फिल्डवर येत नाहीत. त्यामुळे निकृष्ट काम होत राहणार. रस्त्याच्या कामाची तपासणी करण्यासाठी आणि अधिकारी, ठेकेदारावर कारवाईसाठी कायदेशीर दाद मागणार असल्याचे मदन साबळे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

### ठेकेदार ग्रामस्थांमध्ये हमरीतुमरी...

बांधकाम विभागाविरोधात आंदोलन करण्याचा इशारा वडूथकरांनी दिला आहे. यावेळी ठेकेदार राजेशिर्के याला बांधकाम विभागाचे सुपरवायझर सोमनाथ चव्हाण यांनी निकृष्ट काम पाहून ते बंद करण्याचा आदेश दिला. यावेळी ठेकेदार राजेशिर्के यांनी काम बंद करणार नाही. अशी काम बंद करणारी खूप पाहिली आहेत, असे वडूथकरांना आव्हान दिले. यावरुन गावकऱ्यांनी निकृष्ट काम करुच देणार नाही, असा निर्धार देत उलट आवाहन दिल्याने आता रस्त्यावरुन ठेकेदार आणि ग्रामस्थ आमने सामने येण्याची शक्यता वाढली आहे.

## शॉर्ट न्यूज »

### पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या हत्येची अफवा, यंत्रणा हाय अलर्टवर

। लाहोर ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

पाकिस्तानाचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या हत्येची इस्लामाबाद येथे अफवा पसरल्याने खळबळ माजली आहे. त्यामुळे इस्लामाबाद पोलिसांनी परिसरात सुरक्षा वाढवली असून यंत्रणांना हाय अलर्ट जारी केला आहे. पाकिस्तान-तेहरिक-ए-इन्साफ पक्षाचे अध्यक्ष इम्रान खान आज रविवारी इस्लामाबाद येथे येणार होते. मात्र, त्यांच्या हत्येची अफवा पसरल्याने शहरात खळबळ माजली आहे. दरम्यान, इस्लमाबाद पोलिसांच्या प्रवक्त्यांनी शनिवारी सांगितले की, शहरात कलम १४४ लागू केला असून परिसरात सभा घेण्यास बंदी घालण्यात आली आहे.

### चिटगांव जिल्ह्यांतील सीताकुंड शहरात कंटेनर डेपोमध्ये स्फोट

# बांगलादेशात भीषण स्फोट; आतापर्यंत 16 जणांचा मृत्यू, 450 पेक्षा जास्त जखमी

## कंटेनर डेपोमध्ये स्फोट : अपघातात आतापर्यंत 16 लोकांचा मृत्यू

। ढाका । महाईन्यूज । प्रतिनिधी।

बांगलादेशच्या दक्षिण-पूर्व भागातील चिटगांव शहरात भीषण स्फोट झाला आहे. कंटेनर डेपोमध्ये शनिवारी रात्री हा स्फोट झाला असून या अपघातात आतापर्यंत १६ लोकांचा मृत्यू झाला आहे. तर, ४५० पेक्षा जास्त कामगार जखमी आहेत. या कामगारांना जवळच्याच रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांचे शरीर ६० ते ८० टक्के भाजले असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



चिटगांव जिल्ह्यांतील सीताकुंड शहरात एका कंटेनर डेपोमध्ये हा स्फोट झाला. या स्फोटाचे नेमके कारण अद्यापही समोर आले नाही. मात्र, येथील एका कंटेनरमध्ये रसायने भरून ठेवले होते, ज्यामुळे स्फोटानंतर आग जास्त प्रमाणात भडकली असल्याचा दावा स्थानिकांनी केला आहे.

हा स्फोट एवढा भयंकर होता की आजूबाजूच्या इमारतीच्या काचांना तडा गेला आहे. तसेच, या स्फोटाचा आवाज ४ किलोमीटर अंतरावर ऐकू गेल्या. तसेच, शनिवारी रात्री लागलेल्या आगीवर रविवारी सकाळपर्यंत अग्नीशमन दलाचे जवान नियंत्रण मिळवत होते.

### मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता

या डेपोमध्ये ६०० लोक कामगार काम करत असल्याची माहितीही मिळाली. पैकी ४५० लोक जखमी असून १६ लोकांचा मृत्यू झाला आहे. मृतांपैकी २० कामगार गंभीर जखमी असून त्यांचं शरीर ६० ते ८० टक्के भाजले असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

# अमेरिकेच्या फिलाडेल्फियामध्ये जमावावर बेछूट गोळीबार!

## 3 लोकांचा मृत्यू तर अनेकजण गंभीर जखमी

। फिलाडेल्फिया ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

अमेरिकेतील फिलाडेल्फियामध्ये जमावावर बेछूट गोळीबार करण्यात आला आहे. शनिवारी रात्री एका व्यक्तीने बंदूकीने जमावावर अंदाधुंद गोळीबार केलाय. या घटनेमध्ये एकूण तीन लोकांचा मृत्यू झाला असून अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. अमिरेकेच्या वृत्तवाहिनीने दिलेल्या माहितीनुसार घटना मध्यरात्रीनंतर घडली. यात अनेक बंदूकधारी सामील असल्याचे बोलले जात आहे. या घटनेमध्ये मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. आतापर्यंत एकूण १४ जण गंभीर जखमी झाले असल्याची नोंद करण्यात आली आहे.

फिलाडेल्फियामध्ये झालेल्या गोळीबारात बंदूक जप्त करण्यात आली आहे. परंतु हल्ला करणारा व्यक्तीला अटक करण्यात आले आहे का? याबाबत स्पष्टता नाही.



परंतु गोळीबार करणाऱ्या ठिकाणाला सील करण्यात आले आहे. पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार रविवारी पहाटे बंदूकधारी व्यक्तीचा शोध सूरू होता. शूटरपैकी एक अमेरिकन स्ट्रीटवर दक्षिणेकडे धावताना दिसला. गोळीबार झालेल्या घटनास्थळी दोन बंदूका सापडल्या आहेत.

### मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता

गोळीबाराच्या घटनेमध्ये एक २५ वर्षीय महिला आणि २२ वर्षीय तरुणाचा समावेश आहे. तर ७ जखमींना जवळच्या थॉमस जेफरसन रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तर इतर पाच जणांना पेनसिल्व्हेनिया रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आणखी तीन जणांना पेन प्रेस्बिटेरियन मेडिकल सेंटरमध्ये नेण्यात आले आहे. दरम्यान अमेरिकेमध्ये गोळीबार करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. अनेक घटना समोर येत आहेत. २५ मे रोजी टेक्सासमधील एका शाळेत तरुणाने गोळीबार केला होता यामध्ये १९ विद्यार्थी आणि ३ शिक्षकांचा मृत्यू झाला होता.

# भाजपला सर्वधर्मांचा आदर, प्रवक्ता नुपूर शर्माच्या वादग्रस्त वक्तव्यावर पार्टीची स्पष्टोक्ती

। हरारे । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भाजपने पार्टीच्या प्रवक्त्या नुपूर शर्मा यांच्या वक्तव्यानंतर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. नुपूर शर्मा यांनी वादग्रस्त वक्तव्य केले होते यानंतर भाजपवर विरोधकांनी टीकास्त्र डागलं होते. पार्टीने भाजप सर्व धर्माचा आदर करतो असे सांगत आपली भूमिका स्पष्ट केली असून नुपूर शर्मा यांच्या वक्तव्याला पाठिंबा नाही. एका टीव्ही चॅनलवर कार्यक्रमादरम्यान नुपूर शर्मा यांनी पैगंबर मोहम्मद यांच्याबाबत वक्तव्य केलं होते. भाजपने त्यांच्या या वक्तव्यापासून अंग झटकले असून पार्टी धार्मिक एकतेमध्ये विश्वास ठेवते असे सांगितले आहे.

भाजपचे राष्ट्रीय महासचिव आणि मुख्यालय प्रभारी अरुण सिंह यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, भाजप कोणत्याही धर्माचा अपमान स्वीकारत नाही. तसेच कोणत्याही धर्मा आणि सांप्रदायिक भावनांना ठेच पोहोचवणाऱ्या विचारांचा स्वीकारत नाही. भाजप मुख्यालय प्रभारींकडून रविवारी एक पत्र जारी करण्यात आले आहे. यामध्ये असे म्हटलं आहे की,



भारताच्या हजारो वर्षांच्या इतिहासात प्रत्येक धर्मांचा आदर करण्यात आला आहे. भाजप पक्ष सर्व धर्मांचा सम्मान करतो. तसेच कोणत्याही धर्माच्या व्यक्तीच्या अपमानाचा निषेध करते. पक्षाने आपली बाजू स्पष्ट केली आहे. भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्माचा अभ्यास करण्याचा अधिकार आहे. जसे की भारत आपले स्वातंत्र्याच्या 75 वर्षाचा आनंदोत्सव साजरा करत आहे, आम्ही भारताला एक महान देश बनवू शकतो. सर्व समानता आणि प्रत्येक समानतेची साथ असते, जिथे सर्व भारत आणि अखंडता एक जुळते, सर्व विकास आणि विकासाच्या फळाचा आनंद घेतात. नूपुर शर्माच्या विरोधात मुस्लिम समुदायामध्ये आक्रोश आहे. वादग्रस्त वक्तव्यामुळे त्यांच्याविरोधात खटला सुरु आहे.

# अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांच्या सुरक्षेत वाढ

। वॉशिंग्टन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांना शनिवारी सुरक्षा स्थळी हलवण्यात आल्याचे समजते. व्हाईट हाऊसकडून याबाबतची माहिती देण्यात आली आहे. राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांच्या समुद्रकिनाऱ्या जवळील बीच हाऊसवरून एक विमान झोपावले. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तोव जो बायडन आणि त्यांच्या पत्नीला सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आल्याचे समजते.

मिळालेल्या माहितीनुसार, वॉशिंग्टन पूर्वेला असलेल्या रेहोबोथ किनाऱ्यावरील डेलोवेथ इथे हा प्रकार निदर्शनास आला. एक विमान अचानकपणे जो बायडन यांच्या बीच हाऊस येथील हवाई हद्दीत घुसले. या विमानाचा प्रवेश संशयास्पद मानला जात होता.

मात्र हा कोणत्याही प्रकारचा हल्ला नव्हता, असे व्हाईटहाऊस कडून स्पष्ट करण्यात आले आहे.हे विमान चुकून बीच हाऊसच्या हवाई हद्दीत घुसले होते. मात्र सुरक्षेच्या कारणास्तव तातडीने जो बायडन आणि त्यांच्या पत्नीला सुरक्षित स्थळी नेण्यात आले.




# शाहरुख खान कोविड पॉझिटिव्ह, बॉलिवूड पुन्हा करोनाच्या विळख्यात

देशभरात पुन्हा एकदा करोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढताना दिसत आहे. अशात एकीकडे करण जोहरच्या वाढदिवसाच्या पार्टीमध्ये सहभागी झालेल्या ५५ जणांना करोनाची लागण झाल्याची माहिती समोर आली असताच एकामागोमाग एक बॉलिवूड सेलिब्रेटी देखील करोना संक्रमित झाल्याचं समजतंय. कार्तिक आर्यन, आदित्य रॉय कपूर, कतरिना कैफ यांच्या नंतर आता अभिनेता शाहरुख खानची करोना चाचणी पॉझिटिव्ह आल्याची माहिती समोर आली आहे.

शाहरुख खाननं नुकतंच त्याचा आगामी चित्रपट 'जवान'चं पोस्टर चाहत्यांसोबत शेअर केलं. त्यानंतर आता शाहरुखला करोनाची लागण झाल्याची माहिती समोर येत आहे. मात्र शाहरुख खाननं अद्याप यावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही किंवा त्याच्या कुटुंबीयांकडूनही कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे शाहरुख खान काही दिवसांपूर्वी करण जोहरच्या वाढदिवसाच्या पार्टीमध्ये सहभागी झाला होता.

# अभिनेत्रीबरोबरच्या व्हायरल फोटोमुळे बोनी कपूर ट्रोल

नुकत्याच पार पडलेल्या इंटरनॅशनल इंडियन फिल्म ॲकॅडमी (IIFA) पुरस्कार सोहळ्याला बॉलिवूडच्या दिग्गज कलाकार मंडळींनी हजेरी लावली होती. यादरम्यानचे कलाकारांचे अनेक फोटो, व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. सुप्रसिद्ध निर्माते बोनी कपूर यांनी देखील या सोहळ्याला हजेरी लावली होती.



अभिनेत्री व सुत्रसंचालक आरती खेत्रपालबरोबर बोनी कपूर यांनी काढलेला फोटो सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे.

बोनी कपूर यांनी सुत्रसंचालक आरती खेत्रपालबरोबर फोटो काढत असताना तिचा हात पकडला. यावरुनच त्यांना ट्रोल करण्यास नेटकऱ्यांनी सुरुवात केली. या फोटोमध्ये बोनी कपूर यांनी पांढऱ्या रंगाचा कुर्ता-पायजमा परिधान केला असल्याचं दिसत आहे. तसेच आरतीने थाय वन पीस ड्रेस परिधान केला आहे. जेव्हा बोनी कपूर व आरतीने हा फोटो काढला तेव्हा बॉलिवूडमधील इतर मंडळी देखील तिथे उपस्थित होती. या व्हायरल फोटोमुळे बोनी कपूर सध्या ट्रोलर्सच्या निशाण्यावर आहेत. विरल भयानीने त्यांचा हा फोटो त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन शेअर केला आहे. या फोटोवर एक युजरने म्हटलं आहे की, काका कपूर ही तर तुमच्या मुलीच्या वयाची आहे. तर दुसऱ्या युजरने म्हटलं की, तू नेमका कोणता ड्रेस घातला आहेस हेच कळत नाही. बोनी कपूर यांचं वय पाहता त्यांनी अशा प्रकारचा फोटो काढणं चुकीचं आहे असं नेटकऱ्यांचं म्हणणं आहे. मात्र बोनी कपूर यांनी ट्रोलर्सकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलं असल्याचं पाहायला मिळत आहे. आयफा पुरस्कार दरम्यानचे कलाकारांचे ग्लॅमरस लूकमधील बरेच फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल झालेले दिसत आहेत.



# 'धाकड'च्या अपयशानंतर कंगना रणौतचं एक पाऊल मागे?

अभिनेत्री कंगना रणौतचा शेवटचा 'धाकड' चित्रपट प्रदर्शित झाला. मात्र तिचा हा चित्रपट सुपरफ्लॉप ठरला. प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी या चित्रपटाने २ कोटी रुपयांचा पल्ला देखील गाठला नाही. आता तिचा आगामी 'तेजस' चित्रपट प्रदर्शनाच्या मार्गावर आहे. पण हा चित्रपट चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार नसल्याचं बोललं जातंय. कंगनाला मिळालेल्या अपयशानंतर 'तेजस' ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार असल्याची चर्चा आहे.

बॉलिवूड हंगामाच्या रिपोर्टनुसार, 'धाकड'च्या अपयशानंतर 'तेजस' चित्रपट मोठ्या पडद्यावर प्रदर्शित न करण्याचं या चित्रपटाच्या निर्मात्यांनी ठरवलं आहे. कंगनाच्या गेल्या काही चित्रपटांना मिळत असलेलं अपयश पाहता हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच या चित्रपटाचा काही भाग पुन्हा एकदा चित्रीत करण्यात येणार आहे.

अद्याप चित्रपट कधी प्रदर्शित होणार? तसेच कोणत्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर हा चित्रपट प्रदर्शित होईल? याची घोषणा करण्यात आली नाही. पण आता 'तेजस' चित्रपटाबाबत सुरु असलेल्या चर्चांवर या चित्रपटाच्या प्रॉडक्शन हाऊसने स्पष्टीकरण दिलं आहे. "या चित्रपटाचं चित्रीकरण अजूनही बाकी आहे. चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी सगळं चित्रीकरण पूर्ण करण्यात येईल. तसेच ५ ऑक्टोबरला हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर दाखल होईल." असं तेजसच्या निर्मात्यांनी म्हटलं आहे.

# "तुम्ही अभिनय करा, मी राजकारणात येतो" - नाना पाटेकर



प्रसिद्ध अभिनेता नाना पाटेकर यांना आपल्या अभिनयाने सर्वच प्रेक्षकांची मनं जिंकली आहे. चित्रपट हिंदी असो वा मराठी नाना पाटेकर यांचा अभिनय नेहमीच लक्षात ठेवण्यासारखा असतो. त्यांनी आतापर्यंत बरेच हीट चित्रपट दिले आहेत. नुकतंच नाना पाटेकर यांनी कोल्हापूरच्या कागल येथे चार महापुरूषांच्या पुतळ्याचे अनावरण केले.

यावेळी ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ हे देखील उपस्थित होते. यावेळी नाना पाटेकर आणि हसन मुश्रीफ यांच्या मैत्रीची अनोखी गोष्ट आपल्याला पाहायला मिळाली.

या कार्यक्रमासाठी नाना पाटेकर यांचा मुक्काम जवळच्या एका हॉटेलमध्ये करण्यात आला होता. हसन मुश्रीफ यांना याबाबतची माहिती समजताच ते स्वत: नाना पाटेकर यांच्याकडे गेले. त्यांनी नानांचे खास पद्धतीने स्वागतही केले. मुश्रीफ भेटण्यासाठी येत असल्याचे समजताच नाना पाटेकर हे खोलीच्या बाहेर येऊन उभे राहिले. मुश्रीफ समोर येताच नानांनी त्यांची गळाभेट घेतली.

# बॉडी स्प्रेच्या आक्षेपार्ह जाहिरातीमुळे प्रियांका चोप्रा संतापली

सध्या सोशल मीडियावर बॉडी स्प्रेच्या जाहिरातीचा मुद्दा जोरदार चर्चेत आहे. लेयर शॉट या बॉडी स्प्रे ब्रँडची जाहिरात लैंगिक शोषणाला प्रोत्साहन देत असल्याचं म्हणत अनेक सेलिब्रेटींनी या जाहिरातीवर टीका केली आहे. तसेच ही जाहिरात प्रसिद्धि माध्यमांवरून हटवण्याची मागणी केली आहे. या जाहिरातीवर अभिनेत्री प्रियांका चोप्रानं देखील संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.

प्रियांका चोप्रानं या बॉडी स्प्रे जाहिरातीवर आक्षेप घेत एक ट्वीट केलं आहे. तिने लिहिलं, "हे फारच लाजिरवाणं आणि घृणास्पद आहे. या जाहिरातीला हिरवा कंदिल मिळावा म्हणून किती पातळ्यांवर मंजुरी देण्यात आली आणि किती लोकांना हे सर्व योग्य वाटत आहे? मला आनंद वाटतो की मंत्रालयाने यावर योग्य वेळी कारवाई करत ही जाहिरात हटवली आहे."

प्रियांका चोप्रा व्यतिरिक्त अभिनेता फरहान अख्तरनं देखील या जाहिरातीला विरोध करत एक ट्वीट केलं आहे. त्याने आपल्या ट्वीटमध्ये लिहिलं, "सामूहिक बलात्कार आणि महिलांचे लैंगिक शोषण अशा गोष्टींना प्रोत्साहन देणाऱ्या जाहिराती मंजूर कशा होतात. हे खूपच लजास्पद आहे. यावर विचार करणे गरजेचे आहे." याशिवाय अभिनेत्री ऋचा चड्ढा, सोना मोहपात्रा यांनी देखील या जाहिरातीवर आक्षेप घेतला आहे.



काय आहे जाहिरात?

संबंधित जाहिरातीत एक मुलगी मॉलमध्ये शॉपिंग करत असताना काही तरुण तिथे येतात आणि म्हणतात, आम्ही चौघं आणि ही फक्त एक तर मग शॉट कोण घेणार. खरं तर ते बॉडी स्प्रेच्या बॉटलबद्दल बोलत असतात मात्र त्यामुळे ती मुलगी घाबरते. त्या तरुणांचं बोलणं ज्या अर्थाने दाखवण्यात आलं आहे त्यावर सर्वांना आक्षेप घेतला आहे. या जाहिरातीतील दृश्य ही लैंगिक शोषणाला प्रोत्साहन देणारी आहेत असं म्हणत या जाहिरातीला जोरदार विरोध केला जात आहे.

शॉर्ट न्यूज »

## विश्वनाथन आनंदची विजयाची मालिका खंडित



नॉर्वे । महाईन्यूज

५२ वर्षीय आनंद आणि वेस्ली यांच्यातील पारंपरिक विभागातील नियमित लढत २८ चालींअंती बरोबरीत संपली. ही बरोबरीची कोंडी फोडण्यासाठी झालेल्या अर्मगेडन डावात वेस्लीने ४६ चालींमध्ये विजयाची नोंद केली. आनंदने याआधीच्या तीन फेऱ्यांमध्ये अनुक्रमे मॅक्सिम वाशिये-लॅग्रेव्ह, व्हेसेलिन टोपालोव्ह आणि हाओ वांग यांच्यावर मात केली होती. त्यामुळे चौथ्या फेरीतील पराभवानंतरही आनंद नॉर्वेचा जगज्जेता मॅग्नस कार्लसनसह संयुक्तरीत्या अग्रस्थानावर आहे. या दोघांच्याही खात्यावर प्रत्येकी ८.५ गुण आहेत.

**फ्रेंच खुली टेनिस स्पर्धा :** नदाल पुन्हा अंतिम फेरीत; पायाच्या दुखापतीमुळे झ्वेरेव्हची उपांत्य सामन्यात अर्ध्यातून माघार कार्लसनने चौथ्या फेरीत अनिश गिरीला पराभूत करत तीन गुणांची कमाई केली. त्याचप्रमाणे शख्रियार मामेदेरोव्हने हाओ वांगचा, तैमुर रॅजाबोव्हने वाशिये-लॅग्रेव्हचा, तर टोपालोव्हने आर्यन तारीचा पराभव केला.

### आर.आर. स्पोर्ट्स आणि वेलनेस क्लब यांचा आदर्शवत उपक्रम

# क्रिकेट सामन्यांमधून महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय

### चिखली येथील सामाजिक कार्यकर्ते विकास साने यांचा पुढाकार

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।

आर.आर. स्पोर्ट्स आणि वेलनेस क्लब यांनी महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने पुढचे पाऊल टाकले आहे. मोशी येथे महिला क्रिकेटचे सामने भरवण्यात आले असून, यामधून महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय लिहिला जाणार आहे. चिखली येथील सामाजिक कार्यकर्ते विकास साने यांनी आर.आर स्पोर्ट्स आणि वेलनेस क्लब द्वारा महिला क्रिकेट स्पर्धा भरविण्यात आल्या आहेत. या स्पर्धेचे उद्घाटन ४ जून रोजी करण्यात आले.

चिखली येथील एसएनबीपी स्कूलच्या ग्राउंडवर,रिव्हर रेसिडेन्सी हे सामने दोन दिवस खेळविले जाणार आहेत. सामन्यांमध्ये पहीले ,दुसरे आणि तिसरे बक्षीस ट्रॉफी आहे. या शिवाय उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ठ गोलंदाज आणि सर्वोत्कृष्ट खेळाडू यांना बक्षिस म्हणून ट्रॉफी आणि पैठणी देण्यात येणार आहे तसेच. उत्कृष्ट क्षेत्र रक्षक बक्षीस ट्रॉफी आहे. आणि प्रत्येक मॅच मध्ये उत्कृष्ट खेळाडूला सन्मान पदक देण्यात येईल.



### मुलीसाठी आई थेट क्रिकेट पीचवर

आजची पिढी मोबाईल आणि इंटरनेटच्या जाळ्यात गुरफटत चालली असून, त्यांना यातून बाहेर काढण्यासाठी आईने पुढाकार घेणे गरजेचे आहे. आई आणि बाबांची कॉपी मुले करतात. त्यासाठी आपण मैदानी खेळाचे महत्त्व पटवून देण्यासाठी मैदानात उतरणे गरजेचे वाटले असे ४८ वर्षीय आई प्रेरणा मयेकर यांनी सांगितले. आपली मुलगी रीया हिच्यासाठी आपण कार्यालयीन कामकाज पाहून क्रिकेटचा सराव केला. आई आणि मुलगी आम्ही दोघी एकाच संघात खेळत असल्याचे मयेकर यांनी सांगितले.

### कलागुणांना वाव देण्यासाठीच स्पर्धा

विकास साने म्हणाले की, मैदानी खेळ हे सर्वांसाठी किती महत्त्वाचे आहेत. प्रत्येकजन मोबाईल च्या विश्वात गुरफटलेला दिसतो. त्यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी अशा स्पर्धा घेणे गरजेचे आहे. विशेषतः महिला आपल्या कुटूंबाच्या आरोग्याची काळजी घेत असतात. आपल्या कला-गुणांना, छंदांना मुरड घालत असतात. त्यांना खास करून मैदानात उतरविण्यासाठी या स्पर्धा आयोजित केल्या. या स्पर्धा फक्त मोशीपुरत्याच मर्यादीत न ठेवता शहरातील महिलांसाठी घेऊ, त्यासाठी महिलांनी उत्स्फूर्त पुढाकार घ्यावा. मोशीमध्ये महिलांनी मागील दीड ते दोन महिन्यांपासून उत्कृष्ट पध्दतीने सराव केला. पुरुषांच्या बरोबरीने हा खेळ त्यांनी खेळून दाखविला.

### खेळ हा आरोग्यासाठी तसेच तणावमुक्त राहण्यासाठी महत्त्वपूर्ण

प्रशिक्षक नरेश भाकरे म्हणाले, चिखली परिसरातील सोसायट्यांमध्य अनेक महिला वर्किंग वुमेन आहेत. त्यांचे वेळापत्रक खुप व्यस्त असते. मात्र यातून वेळ काढून प्रत्येक महिला खेळाडून दररोज मैदानात सराव केला. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार त्यांनी उत्कृष्ट फलंदाजी केली. खेळाडु प्रतिभा सूर्यवंशी म्हणाल्या, जेंव्हापासून टुर्नामेंट सुरु झाल्या, तेव्हापासून प्रत्येक महिला खेळांडून आरोग्याकडे चांगल्या प्रकारे लक्ष देण्यास सुरुवात केली. खेळ हा आरोग्यासाठी तसेच तणावमुक्त राहण्यासाठी महत्वपर्ण आहे. यासाठी प्रत्येक महिलांनी पुढाकार घ्यायला पाहिजे. स्वतःसाठी जगले पाहिजे.

ए-१६ क्विन्स संघाचे प्रशिक्षक म्हणून नरेश भाकरे, रफ्ती रॉक्सचे अंकुश बनसोडे, फास्ट ॲण्ड फुरिअसचे अलंकार, क्रिक मोनार्कचे प्रकाश पाटील, प्रोव्हो ॲंजल्स टीमचे कृष्णा, सी- लायनेसचे प्रशिक्षक म्हणून राजेश भट यांनी काम पाहिले.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही